मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९८ वा ● सोमवार, ता. १९ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## आजोबागड डोंगरमाथ्यावर अडकलेले १२ गिर्यारोहक सुखरूप

### SOS कॉलला भारतीय लष्कराचा तात्काळ प्रतिसाद

**अहमदनगर । रयत समाचार**

ठाणे-अहिल्यानगर-नाशिक या तीन जिल्ह्यांच्या सीमाभागातील आजोबागड डोंगरमाथ्यावर गेल्या २४ तासांपासून अडकलेल्या १२ गिर्यारोहकांचा (नऊ पुरुष व तीन महिला) अखेर सुखरूप बचाव करण्यात आला. १७ जानेवारी रोजी प्राप्त झालेल्या तातडीच्या एका कॉलला भारतीय लष्कराने तात्काळ प्रतिसाद देत ही मोहीम हाती घेतली. अहिल्यानगर येथील लष्करी अधिकाऱ्यांनी वेळ न दवडता स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधून समन्वय साधला आणि संयुक्त बचावकार्याची आखणी करण्यात आली. आजोबागड परिसर अतिशय दुर्गम, दाट जंगल व खडकाळ मार्गांनी वेढलेला असल्याने बचावकार्य आव्हानात्मक ठरले. या मोहिमेत पोलीस, वनविभाग (वन्यजीव), स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अचूक नियोजन, जिद्द आणि अनुभवाच्या बळावर पथकांनी कठीण चढ-उतार पार करत गिर्यारोहकांपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले. गिर्यारोहकांना शोधल्यानंतर त्यांना आवश्यक ती प्राथमिक वैद्यकीय मदत देण्यात आली. त्यानंतर सर्वांना सुरक्षितपणे खूमशेत गावाच्या पायथ्याशी खाली आणण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत कोणतीही जीवितहानी न होता सर्व १२ गिर्यारोहक सुखरूप असल्याने प्रशासनाने सुटकेचा निश्वास टाकला. वेळेवर मिळालेला संदेश, भारतीय लष्कराची तत्परता, विविध शासकीय यंत्रणांमधील उत्कृष्ट समन्वय आणि स्थानिक ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे ही मोहीम यशस्वी ठरली. जीव वाचवण्यासाठी दाखवलेल्या सेवाभावामुळे नागरी-लष्करी यंत्रणांचे नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

## अभिनेते अक्षय मुडवाडकर, नचिकेत जोग बुधवारी बेळगावात



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

स्वामी समर्थ पादुका आणि पालखी परिक्रमेचे आज सोमवारी बेळगाव शहरात आगमन होत आहे. सदर पादुका आणि पालखी परिक्रमा सात दिवस बेळगावात विविध ठिकाणी मुक्कामी राहणार आहे. दरम्यान याच काळात कलर्स मराठी वाहिनीवर लोकप्रिय ठरलेल्या ''स्वामी समर्थ'' मालिकेतील कलाकारही बेळगावच्या परिक्रमेत बुधवार, ता. २१ रोजी सहभागी होणार आहेत. सध्या कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या ''स्वामी समर्थ'' या मालिकेत स्वामींची भूमिका करणारे अभिनेते अक्षय मुडवाडकर आणि चोळापाची भूमिका करणारे अभिनेते नचिकेत जोग बुधवारी दुपारी खासबाग ओम नगर येथील खोबरे कुटुंबीयांच्या निवासस्थानाजवळ होणाऱ्या पादुका-पालखी पूजन तसेच महाप्रसाद कार्यक्रमात सहभागी होतील. सायंकाळी चार वाजता संत गाडगेबाबा भवन, शामाप्रसाद मुखर्जी रोड येथे आयोजित कार्यक्रमाला अभिनेते अक्षय मुडवाडकर आणि नचिकेत जोग उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात बेळगावचे महापौर मंगेश पवार यांच्या हस्ते दोन्ही कलाकारांचा सन्मान करण्यात येणार आहे. याप्रसंगी अन्नछत्र मंडळाचे ट्रस्टी अभय खोबरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमात बेळगावात ज्या-ज्या ठिकाणी पालखी परिक्रमा होते त्या आयोजकांचा सत्कार अभिनेते अक्षय मुडवाडकर आणि नचिकेत जोग यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वामी समर्थ आराधना केंद्राचे अध्यक्ष नारायण पाटील, सचिव सुनिल चौगुले, डॉ. अशोक खोबरे व सहकाऱ्यांनी केले आहे.

## विमान प्रवाशांचे हाल महागात

### 'डीजीसीए'कडून इंडिगोला २२.२ कोटींचा दंड

**नवी दिल्ली । रयत समाचार**

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात इंडिगो एअरलाईन्सच्या विमान सेवांमध्ये झालेल्या मोठ्या खोळंब्यामुळे हजारो प्रवाशांना सोसावा लागलेला मनस्ताप आता कंपनीला चांगलाच महागात पडला आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA) या प्रकरणाची गंभीर दखल घेत इंडिगोवर २२.२ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. यामध्ये ६८ दिवसांसाठी दररोज ३ लाख रुपये दंडासह १.८० कोटी रुपयांचा अतिरिक्त दंड समाविष्ट आहे. डिसेंबर २०२५ च्या पहिल्या आठवड्यात इंडिगोच्या व्यवस्थापनावर मोठा ताण दिसून आला होता. या काळात सुमारे २,५०७ विमाने रद्द करण्यात आली, तर १,८५२ विमानांना विलंब झाला. परिणामी देशातील विविध विमानतळांवर सुमारे तीन लाख प्रवासी अडकून पडल्याचे सांगण्यात येते. या प्रकरणाच्या चौकशीसाठी डीजीसीएने चार सदस्यांची समिती नियुक्त केली होती. समितीच्या अहवालात इंडिगोच्या कारभारातील अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याचे नमूद करण्यात आले आहे.




नियमांना डावलून केवळ नफा आणि संसाधनांचा अतिवापर करण्यावर भर दिल्यामुळे संपूर्ण यंत्रणा कोलमडल्याचे निरीक्षण या अहवालात नोंदवण्यात आले आहे. तपास अहवालानुसार, इंडिगोने वैमानिक व कर्मचारी वर्गासाठी लागू असलेल्या नवीन 'फ्लाईट ड्युटी टाइमिंग' (FDTL) नियमांचे पालन केले नाही. कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासांचे नियोजन करताना कोणताही बफर किंवा आपत्कालीन पर्याय ठेवण्यात आला नसल्याचेही समोर आले आहे. अधिकाधिक उड्डाणांच्या नादात कर्मचाऱ्यांवर ताण वाढला आणि त्याचा परिणाम सेवा विस्कळीत होण्यावर झाला. या बेजबाबदारपणामुळे प्रवाशांना आर्थिक फटका बसण्यासोबतच मानसिक त्रासही सहन करावा लागल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी डीजीसीएने इंडिगोला ५० कोटी रुपयांची बँक गॅरंटी जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पीटर एलबर्स यांच्यासह वरिष्ठ व्यवस्थापनाला कठोर ताकीद देण्यात आली आहे. इंडिगोच्या संचालक मंडळाने चूक मान्य करून अंतर्गत प्रक्रियेत सुधारणा करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे.

## राऊतांची 'गुगली', शिंदेसेना अस्वस्थ

### महापौर पदाचा पेच कायम



**मुंबई । रयत समाचार**

मुंबई महापालिकेत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतरही महापौर कोणाचा होणार, याबाबतचा पेच अद्याप सुटलेला नाही. अशातच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या सूचक वक्तव्यामुळे महापौर निवडीच्या घडामोडींना नवा रंग चढला असून शिंदे गटात अस्वस्थता वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे. राऊत यांनी ''मुंबईमध्ये भाजपचा महापौर होऊ नये, असे अनेकांना वाटते. शिवसेनेचा किंवा ठाकरे बंधूंचा महापौर हवा,'' असा दावा करत राजकीय संकेत दिले. तसेच ''नगरसेवक हे मूळचे शिवसैनिकच आहेत. बहुमत हे चंचल असते. ते कधीही इकडून तिकडे सरकू शकते,'' असे म्हणत त्यांनी महायुतीतील नगरसेवकांच्या नाराजीचा अप्रत्यक्ष उल्लेख केला. ''तुम्ही किती काळ नगरसेवकांना कोंडून ठेवणार? कोंडलेल्या नगरसेवकांशी संपर्क साधण्याची अनेक साधने असतात,'' असे म्हणत राऊत यांनी हॉटेलमध्ये नगरसेवकांना ठेवण्याच्या चर्चांवरही भाष्य केले. ''देवाची इच्छा असेल तर शिवसेनेचा महापौर बसू शकतो. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात फोनवर चर्चा झाली आहे. पडद्यामागे अनेक घटना घडत आहेत,'' असा दावा करत त्यांनी राजकीय हालचाली वाढल्याचा संकेत दिला. दरम्यान, ''काही नगरसेवक ताज लँड्स एंडमध्ये कोंडून ठेवले आहेत. बाहेर चौकी पहारे बसवले आहेत. त्यांना आधी बाहेर काढा,'' असा टोला लगावत ''आज आम्ही ताज लँड्स एंडमध्ये जेवायला चाललो आहोत,'' असे म्हणत त्यांनी एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांच्यावर मिश्किल शैलीत निशाणा साधला. यावर शिंदे गटाच्या नेत्या शितल म्हात्रे यांनी प्रत्युत्तर देताना ''नगरसेवकांना कोंडण्यात आलेले नाही. २९ पैकी १९ नगरसेवक पहिल्यांदाच निवडून आले आहेत. त्यांना महापालिकेचे कामकाज समजावे म्हणून दोन दिवसांचे शिबिर ठेवले आहे,'' असे स्पष्ट केले. ''महापौरासह सर्व निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील. बार्गेनिंग वगैरे आम्ही करत नाही,'' असेही त्यांनी सांगितले. महापौरपदाच्या निवडीवर निर्णायक टप्पा जवळ येत असतानाच राऊतांच्या या वक्तव्यामुळे महायुतीतील अंतर्गत हालचाली वाढल्याचे दिसून येत आहे.




## मराठमोळ्या अंदाजात मुख्यमंत्र्यांचे स्वागत

**दावोस । रयत समाचार**

महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) २०२६ मध्ये सहभागी होण्यासाठी स्वित्झर्लंडमधील दावोसकडे रवाना झाले आहेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून या नव्या 'महा-ग्रोथ' गाथेकडे जग अपेक्षेने पाहत आहे. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी WEF २०२६ महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. गेल्यावर्षी महाराष्ट्राने १६ लाख कोटींचे गुंतवणूक करार केले असून, यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट राज्य शासनाने ठेवले आहे. दावोस येथे होणाऱ्या परिषदेदरम्यान जागतिक उद्योगसमूह, गुंतवणूकदार आणि धोरणकर्त्यांशी चर्चा करून महाराष्ट्रात थेट विदेशी गुंतवणूक, औद्योगिक प्रकल्प, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. दरम्यान, झ्युरिक (स्वित्झर्लंड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे माता-भगिनींनी लेझीम खेळत स्वागत केले. स्वित्झर्लंडमधील मराठी जनतेकडून मिळालेल्या प्रेम, आपुलकी आणि स्वागतासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## दोन्ही राष्ट्रवादी एकाच चिन्हावर लढणार?

### मंत्री दत्तात्रय भरणेंचं सूचक वक्तव्य

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाल्यानंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यासह राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागील दोन दिवसांत दोन्ही राष्ट्रवादीतील प्रमुख नेत्यांच्या भेटीगाठी वाढल्याचे चित्र असून, अजित पवार आणि शरद पवार यांची बारामतीत एका कार्यक्रमानिमित्त भेट झाल्याचीही चर्चा आहे. दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. ''वैयक्तिक माझं मत असं आहे की, मग कुठलीही आघाडी असो, फक्त आमच्या पक्षाचीच नाही तर कोणतीही



आघाडी असली तरी चिन्ह हे एकच असलं पाहिजे,'' असे भरणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. ते पुढे म्हणाले, ''जिल्हा परिषदेच्या निवडणुका दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढण्याबाबत आमच्या पक्षाचे अध्यक्ष अजित पवार योग्य तो निर्णय घेतील. ग्रामीण भागातील अनेक लोकांचा मतदान करताना चिन्हावरून गोंधळ होतो. त्यामुळे एकत्र लढायचे ठरल्यास चिन्हाबाबत स्पष्टता असणे गरजेचे आहे. मात्र, अंतिम अधिकार अजित पवार यांचाच आहे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची घोषणा नुकतीच केली असून नोटिफिकेशन १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १६ जानेवारी २०२६ ते २१ जानेवारीदरम्यान असून अर्जांची छाननी २२ जानेवारी रोजी होणार आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत २७ जानेवारी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप २७ जानेवारी दुपारी ३.३० नंतर करण्यात येणार असून मतदान ५ फेब्रुवारी रोजी होईल. मतमोजणी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. या निवडणुका कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर तसेच मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव व लातूर या जिल्ह्यांमध्ये होणार आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार की स्वतंत्र लढणार, तसेच चिन्हाबाबत नेमका काय निर्णय होणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## राजभाषेच्या हक्कासाठी एकत्र या- गावस

### तिसऱ्या मराठी राजभाषा साहित्य संमेलनास सुरुवात

**माशेल । रयत समाचार**

गोमंतकाची भाषा मराठीच असून ती हजारो वर्षांपासून गोव्यात बोलली व लिहिली जाते. येथील लोकसाहित्य, देवस्थानांसह सर्व सामाजिक व्यवहार, रिती, परंपरा, संस्कृती आणि संस्कारांतही मराठीच आहे. त्यामुळे गोमंतकात सर्वाधिक वापर मराठीचा होतो. शिक्षणात आणि वाचनात मराठी आहे. त्यामुळे गोव्याची भाषा मराठी आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही, असे प्रतिपादन तिसऱ्या मराठी राजभाषा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत महादेव गावस यांनी माशेल येथे केले. तिसऱ्या मराठी राजभाषा साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष चंद्रकांत गावस, उद्घाटक आमदार गोविंद गावडे, प्रमुख कार्यवाहक डॉ. मधू घोडकिरेकर, मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रदीप घाडी आमोणकर, 'मराठी असे आमुची मायबोली'चे प्रमुख प्रकाश भगत, कार्याध्यक्ष विनायक नार्वेकर, कार्याध्यक्ष नोनू नाईक उपस्थित होते. गावस पुढे म्हणाले, मराठी भाषा हाच गोव्याचा आत्मस्वर आहे, हे काळाने सिद्ध केलेले शाश्वत सत्य आहे. गोव्याच्या मातीची भाषा मराठी आहे, लोकभाषा मराठी आहे. त्यामुळेच प्राचीन शिलालेख, ताम्रपटांसह तत्कालीन साहित्य व लोकजीवनात मराठीच होती आणि आजच्या सांस्कृतिक, सामाजिक व व्यावहारिक जीवनातही मराठीच आहे. गावपातळीवर मराठी भाषेचे बळकटीकरण व्हावे, संतसाहित्य आणि आधुनिक साहित्य यांचा संगम साधला जावा तसेच सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन व्हावे, या उद्देशाने यावेळी साहित्य दिंडी काढण्यात आली. ही दिंडी माशेलवासीयांच्या स्मरणात राहणारा मराठी उत्सव ठरली. मराठी साहित्याच्या गजरात सुरू झालेल्या या संमेलनाने मराठी भाषेच्या




भविष्यासाठी नवा आत्मविश्वास निर्माण केला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. गावस यांनी सांगितले की, गोव्यात मराठीच्या शाळा तसेच मराठी वर्तमानपत्रे आणि मासिके अधिक आहेत. त्याचा वाचकवर्ग मोठा आहे. मराठीसाठी कार्य करणाऱ्या अनेक संस्था आहेत. गावोगावी सांस्कृतिक कार्यक्रमांतून मराठीचा गजर सुरू असतो. त्यामुळे मराठीला तिच्या हक्काचे स्थान प्राप्त होणे गरजेचे आहे. विविध स्तरांवर आणि वेगवेगळ्या प्रकारे मराठीची चळवळ सुरू आहे. मायमराठीसाठी सर्वांनी एकत्र येऊन नव्याने लढा देण्याची गरज आहे. यावेळी डॉ. मधू घोडकिरेकर यांनी बसस्थानक, बाणस्तारी मार्केट प्रकल्पाच्या नामकरणाबाबत विचार व्यक्त केले. त्यावर आमदार गोविंद गावडे यांनी सकारात्मक भूमिका मांडली. प्रियोळ येथील अनेक शाळा उत्तम स्थितीत असून त्या शाळांची पुनर्बांधणी आमदार गावडे यांनी केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. नोनू नाईक, प्रकाश भगत यांनीही मनोगत व्यक्त केले. श्री शांतादुर्गा महिला मंडळातर्फे स्वागतगीत सादर करण्यात आले. श्री देवकीकृष्ण कालोत्सव मंडळातर्फे गणेशवंदना सादर करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. गोविंद भगत यांनी केले, तर आभार ज्येष्ठ पत्रकार अवित बगळे यांनी मानले.

## ५ ते ८ फेब्रुवारीला 'बेल्कॉन' व ऑटो एक्सपो

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

क्रेडाई बेळगाव व यश इव्हेंट्स यांच्यावतीने 'बेल्कॉन २०२६' बांधकाम, प्रॉपर्टी, बांधकाम साहित्य, इंटिरियर्स, एक्स्टेरिअर, फर्निचर तसेच ऑटो एक्सपो प्रदर्शनाचे आयोजन ५ ते ८ फेब्रुवारीदरम्यान येथील सीपीएड मैदानावर करण्यात आले आहे. यावेळी प्रथमच हे प्रदर्शन अत्यंत आधुनिक व सुसज्जित अशा वातानुकूलित शामियान्यात संपन्न होणार आहे, अशी माहिती क्रेडाई बेळगावचे अध्यक्ष युवराज हुलजी, इव्हेंट चेअरमन प्रशांत वांडकर तसेच यश इव्हेंट्सचे संचालक प्रकाश कालकुंद्रीकर यांनी शुक्रवारी सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. युवराज हुलजी म्हणाले, कर्नाटकात बेंगळुरूनंतर बेळगावात अशा प्रकारचे भव्य रिअलिटी, इंटिरियर्स आणि बांधकाम साहित्य प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे.

तीन राज्यांच्या सीमेवर असलेल्या बेळगाव शहराचा झपाट्याने विकास होत असून बांधकाम क्षेत्राला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्राहकांना एकाच छताखाली स्वप्नातील घरासाठी आवश्यक सर्व प्रकारच्या बांधकाम साहित्याची माहिती मिळावी, या




उद्देशाने क्रेडाई बेळगावकडून सलग आठव्या वर्षी 'बेल्कॉन'चे आयोजन करण्यात येत आहे. इव्हेंट चेअरमन प्रशांत वांडकर म्हणाले, तब्बल एक लाख स्क्वेअर फुट जागेत 'बेल्कॉन' आणि ऑटो एक्सपो प्रदर्शन संपन्न होत आहे.

प्रदर्शनात 'बेल्कॉन'च्या १५० स्टॉल्समध्ये फ्लॅट, बंगला, विटा, वाळू, स्टील, प्लायवूड, लाइटिंग, गृहसजावट, लिफ्ट यांसह बांधकाम क्षेत्रातील विविध साहित्य व सुविधांची माहिती ग्राहकांना मिळणार आहे. चार दिवसांच्या या प्रदर्शनादरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून बांधकाम क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, चर्चासत्र, स्पर्धा तसेच 'बेळगाव डेव्हलपमेंट कॉन्क्लेव्ह' हा कार्यक्रमही होणार आहे. या प्रदर्शनाला प्रिया शक्ती स्टील, ओरियनिस, जीएम लाइटिंग, विशाल इन्फ्रास्ट्रक्चर, व्हिव्हा, श्रीराम इनवोकेशन, साईराज कन्स्ट्रक्शन, चैतन्य डेव्हलपर्स, पार्वती कन्स्ट्रक्शन, वात्सल्य कन्स्ट्रक्शन यांचे प्रायोजक स्वरूपात महत्त्वाचे सहकार्य लाभले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

क्रेडाईचे वरिष्ठ पदाधिकारी आनंद कुलकर्णी म्हणाले, या प्रदर्शनात स्थावर मालमत्ता सल्लागार व बांधकाम व्यावसायिक सहभागी होणार असून ग्राहकांना आकर्षक ऑफर व सवलतींमध्ये उपलब्ध प्लॉट, फ्लॅट, व्यावसायिक जागा, नाविन्यपूर्ण बांधकाम साहित्य आणि आधुनिक इंटिरियर डिझाइन संकल्पनांद्वारे गुंतवणुकीची संधी मिळणार आहे. राजेंद्र मुतगेकर यांनीही बेळगाव शहराच्या विकासासाठी क्रेडाईने हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. चैतन्य कुलकर्णी व सुधीर पनारे यांनीही यावेळी विचार मांडले. यश इव्हेंट्सचे संचालक प्रकाश कालकुंद्रीकर यांनी ऑटो एक्सपो संदर्भात सांगितले की, सलग सातव्या वर्षी ऑटो एक्सपोचे आयोजन करण्यात येत आहे.

या प्रदर्शनात शंभर स्टॉल्सवर नामवंत कंपन्यांच्या कार, टू व्हीलर, ई-व्हेईकल्स, वाहने व स्पेअर पार्ट्स, विंटेज कार, स्टंट ड्रायव्हिंग आदींचे प्रदर्शन पाहायला मिळणार आहे. 'बेल्कॉन २०२६' आणि ऑटो एक्सपोला यंदाही बेळगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी क्रेडाईचे महेश फगरे, ज्ञानेश्वर सायनेकर, सचिन बैलवाड, यश इव्हेंट्सचे अजिंक्य कालकुंद्रीकर, विनय कदम यांच्यासह प्रायोजक प्रतिनिधी व अन्य सदस्य उपस्थित होते.

# आज न्यू आर्ट्स महाविद्यालयात 'नगारा संगीत महोत्सव'

**अहमदनगर । रयत समाचार**



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयातील संगीत विभागाच्या वतीने शहरात ता. १९ व २० जानेवारी रोजी 'नगारा संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. प्रतीवर्षी आयोजित होणारा आणि केवळ महाविद्यालयाच्याच नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा महोत्सव म्हणून 'नगारा संगीत महोत्सव'चे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. मागील सहा वर्षांच्या यशस्वी वाटचालीनंतर यंदा ७ व्या 'नगारा संगीत महोत्सव'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ता. १९ जानेवारी रोजी सायं. ६.०० वाजता महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या हस्ते होईल. त्यानंतर स्व. उस्ताद राशिद खां यांचे पट्टशिष्य सुप्रसिद्ध गायक पं. नागेश आडगावकर यांची शास्त्रीय व सुगम गायनाची मैफल होणार आहे. त्यांना संवादिनीवर स्वानंद कुलकर्णी, तबल्यावर रोहन पंढरपूरकर, व्हायोलिनवर संजुक्ता फुकान, पखवाजवर रोहित खवळे व स्वरसाथ प्रफुल्ल सोनकांबळे साथसंगत करणार आहेत. मंगळवार, ता. २० जानेवारी रोजी सायं. ६.०० वाजता सुप्रसिद्ध गायक पं. डॉ. राम देशपांडे व त्यांचे सुपुत्र आणि पट्टशिष्य सुप्रसिद्ध गायक श्री. गंधार देशपांडे यांचा गुरु-शिष्य परंपरा अंतर्गत 'सहगायन' हा शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यांना संवादिनीवर मकरंद खरवंडीकर, तबल्यावर प्रशांत गाजरे व पखवाजवर सौरभ साठे साथसंगत करणार आहेत. याप्रसंगी संस्थेचे सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज सभागृह येथे होणार आहेत. तसेच, ता. १९ जानेवारी रोजी राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा महाविद्यालयातील राजर्षी शाहू सभागृह येथे व राज्यस्तरीय अभंग गायन स्पर्धा (वैयक्तिक) राजमाता जिजाऊ सेमिनार हॉल येथे सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. सायं. ५ वाजता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून सर्व नगरकर संगीतप्रेमी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे व संगीत विभागप्रमुख प्रा. आदेश चव्हाण यांनी केले आहे.

# सावित्री-ज्योती महोत्सवाचे उद्घाटन संपन्न

## महिला बचत गटांच्या उत्पादनांचा समावेश

**अहमदनगर । रयत समाचार**




जीभेच्या चवेसाठी स्वयंपाकगृह सजल्याने अनेक आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. यामुळे वैद्यकीय क्षेत्र हे जगातील सर्वात मोठी इंडस्ट्री बनत चालली आहे. निरोगी व आनंदी कुटुंबासाठी आरोग्यदायी स्वयंपाकगृह महत्त्वाचे ठरत आहे. या संकल्पनेने आनंदी कुटुंबाची अनुभूती मिळणार असल्याचे प्रतिपादन पद्मश्री पोपट पवार यांनी केले.अहिल्यानगर महापालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर बार असोसिएशन, समाजकार्य महाविद्यालय तसेच जिल्ह्यातील विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात आयोजित सावित्री-ज्योती महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी पवार बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश योगेश पैठणकर, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, जिल्हा विशेष सरकारी वकील अ‍ॅड. सुरेश लगड, जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष अ‍ॅड. महेश शिंदे यांच्यासह अ‍ॅड. दिनेश शिंदे, अनंत द्रविड, गौतम कुलकर्णी, जयेश शिंदे, अ‍ॅड. गायत्री गुंड, अ‍ॅड. तुषार शेंडगे, अ‍ॅड. अक्षय ठोकळ, विद्या शिंदे, मनीषा भिंगारदिवे, आरती शिंदे, ज्ञानदेव पांडुळे, भाऊसाहेब पादिर, दिपाली उदमले तसेच मोठ्या संख्येने महिला बचत गटांच्या प्रतिनिधी उपस्थित होत्या.पद्मश्री पवार म्हणाले की, खेळामुळे शरीर सुदृढ झाले आणि त्याचा उपयोग ग्रामविकास व सामाजिक कार्यात अधिक प्रभावीपणे करता आला. सामाजिक चळवळींना बळ देणे अत्यंत आवश्यक असून त्यातून समाजाला योग्य दिशा मिळते. महिलांसाठी आयोजित केलेला हा सावित्री-ज्योती महोत्सव म्हणजे महिला सक्षमीकरणाची नांदी आहे. पैसा व प्रतिष्ठेपेक्षा जीवनातील आनंद अधिक महत्त्वाचा असून स्वावलंबी व आनंदी समाज घडवण्यासाठी प्रत्येकाच्या जीवनात आनंद निर्माण होईल असे प्रयत्न व्हायला हवेत, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी न्यायाधीश योगेश पैठणकर यांनी महोत्सवाचे कौतुक करताना सांगितले की, नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच महिलांसाठी ही मोठी पर्वणी ठरत आहे. राज्यातील विविध नामांकित व दर्जेदार उत्पादने एकाच छताखाली उपलब्ध होत असल्याने नगरकरांना मोठी संधी उपलब्ध होत आहे. या महोत्सवातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हे अत्यंत सकारात्मक पाऊल आहे. अनेक महिलांनी स्वतःच्या उत्पादनांचा स्वतंत्र ब्रॅण्ड निर्माण केल्याचा आनंद येथे पाहायला मिळतो. दहा वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या या महोत्सवाचे त्यांनी विशेष कौतुक केले.महोत्सवाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोपाला पाणी अर्पण करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी बचत गटांच्या वस्तूंच्या भव्य प्रदर्शनाला भेट देत उत्पादनांची माहिती घेतली. या चार दिवसीय महोत्सवात अकोले-राजूर येथील हातसडीचे तांदूळ, इंद्रायणी, काळभात, पेढे, गावरान कडधान्य, राहुरीचे गावरान तूप, विविध प्रकारचे मसाले, जळगावचे तांब्याचे दिवे, ज्वारी व नाचणी पापड, जामखेडची लाकडी पोळपाट-लाटणे, आवळ्याचे पदार्थ, मेहंदी, मॅग्नेटिक थेरपी, आयुर्वेदिक उत्पादने, आयुर्वेदिक सॅनिटरी नॅपकिन, सेंद्रिय गुळाचा बासुंदी चहा, कॉफी-लेमन टी, रांगोळ्या, हस्तनिर्मित दागिने, वुलन प्रॉडक्ट्स, स्किन केअर, खाकर, चटण्या, मुखवास, पापड, उन्हाळी पदार्थ, खेळणी, पर्स, वनौषधी, पूजा साहित्य, साड्या, रेडिमेड ब्लाऊज, हर्बल कॉस्मेटिक्स, लहान मुलांचे कपडे, गुळ पावडर, माठातले लोणचे यांसह विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. यावर्षी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बीड, हिंगोली, नांदेड तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला बचत गट व महिला लघुउद्योगांचा महोत्सवात मोठा सहभाग आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अ‍ॅड. दिनेश शिंदे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. सृष्टी उदमले या विद्यार्थिनीने सादर केलेल्या बहारदार नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अ‍ॅड. महेश शिंदे यांनी केले, तर आभार अनंत द्रविड यांनी मानले.

# शासकीय चित्रकला परीक्षेत आनंद विद्यालयाचे यश

**अहमदनगर । रयत समाचार**



शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत आनंद विद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही ग्रेड परीक्षांमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यशाची पताका फडकावली.

एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत "अ" श्रेणीत त्रिशा प्रीतमकुमार कांबळे व खुशी शरद धुरपते यांनी यश संपादन केले. "ब" श्रेणीत वैष्णवी संजय उदमले, ओवी लक्ष्मण जायभाय, निधी शशिकांत वैद्य, सुलभ बागुल, संस्कृती अरुण गायकवाड व धनश्री हिराकांत भिंगारदिवे हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले, तर "क" श्रेणीत एकूण ४७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत "अ" श्रेणीत १६ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये आदिती ज्ञानदेव सावंत, अक्षता संतोष तुंगार, आयुष वसंत अडसूळ, चेतना नितीन राणा, गौरी गणेश शिंदे, हर्षा शेखर शिंदे, निर्मिती धर्मेंद्र कुशवाह, प्राची संदीप खरात, राणी हिरालाल गौतम, श्रावणी बाळासाहेब मायकर, सौम्यश्री शिवाजी मकरंद, अभिज्ञा अनिल भोर, गार्गी संजय ढेंगेकर, प्रिया किसन गळगटे, स्वरा प्रशांत टोणपे व शर्वरी आबासाहेब ढगे यांचा समावेश आहे.

"ब" श्रेणीत नजन प्रियंका भाऊसाहेब, सई महेश आनंदकर, सायली मंजाबापू वाघ व यश नितीन ननावरे उत्तीर्ण झाले, तर "क" श्रेणीत एकूण १८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक स्वाती ननावरे व मल्लेश्वरी बोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. गुणवंत विद्यार्थ्यांचे आनंद एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दौलत जानकू शिंदे, उपाध्यक्ष विनोद चत्रभूज बजाज, सचिव किसन तरटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अष्टेकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पोखरकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले.

# शिवसेना सत्ताधाऱ्यांची झोप उडवेल- विक्रम राठोड

## शिवसेनेच्या विजयी नगरसेवकांचा शिवालयात सत्कार

**अहमदनगर । रयत समाचार**




महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये प्रतिकूल परिस्थिती, दबाव आणि विरोधी प्रवाहाला छेद देत शिवसेना शिंदे गटाचे दहा नगरसेवक विजयी झाले. या यशाबद्दल चितळे रोड येथील स्व. माजी आमदार अनिल राठोड यांच्या कार्यालयात विजयी नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. शिवसेनेचे युवा नेते विक्रम राठोड यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगरसेवक सुरेखा कदम, मंगल लोखंडे, सुनीता गेनाप्पा, रूपाली दातरंगे, वैशाली नळकांडे, बाळासाहेब बोराटे, संजय शेंडगे, दत्तात्रय कावरे, गणेश कवडे व नवनाथ कातोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संभाजी कदम, शाम नळकांडे, संतोष गेनाप्पा, परेश लोखंडे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सत्कारप्रसंगी बोलताना विक्रम राठोड म्हणाले, "काही जागांवर अत्यल्प मतांनी पराभव स्वीकारावा लागला असला, तरी तो पराभव नसून पुढील लढ्याची नांदी आहे. पुढील पाच वर्षे महानगरपालिकेत शिवसेना सत्ताधाऱ्यांची झोप उडवेल. नगर शहरातील प्रश्न, अन्याय, भ्रष्टाचार आणि हिंदुत्वाचा बुलंद आवाज शिवसेना आक्रमकपणे मांडेल." ते पुढे म्हणाले, "आज दहा नगरसेवक आहेत, उद्या नगरचा महापौर आणि आमदारही शिवसेनेचाच असेल. नगरच्या राजकारणात शिवसेनेचा भगवा झेंडा पुन्हा अभिमानाने फडकणार आहे. हे कोणीही रोखू शकत नाही," असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# शिक्षणासोबतच आरोग्य हे देखील समाज उन्नतीचे महत्त्वाचे माध्यम- डॉ. अशफाक पटेल

## अल करम हॉस्पिटल येथे सर्वरोग निदान शिबिर उत्साहात

**अहमदनगर । आबीद खान**




शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हे फातिमा शेख यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. ज्या काळात महिलांना आणि विशेषतः अल्पसंख्याक समाजातील महिलांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते, त्या काळात फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून शिक्षणाचा लढा दिला. त्यांच्या धैर्यामुळे आज अनेक पिढ्यांना शिक्षणाची दिशा मिळाली आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेले हे सर्वरोग निदान शिबिर म्हणजे त्यांच्या विचारांना दिलेली खरी मानवंदना आहे. शिक्षणासोबतच आरोग्य हे देखील समाज उन्नतीचे महत्त्वाचे माध्यम आहे. निरोगी समाजाशिवाय सशक्त राष्ट्र उभे राहू शकत नाही. फातिमा शेख यांचे विचार आत्मसात करून आपण शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सेवेतून समाजासाठी कार्य करत राहू, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन प्रसिद्ध डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अशफाक पटेल यांनी केले. अल करम हॉस्पिटल व मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका क्रांतीज्योती फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त अल करम हॉस्पिटल येथे सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिरात डॉ. अशफाक पटेल यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. तपासणी झालेल्या सर्व रुग्णांना मोफत औषधेही वितरित करण्यात आली. यावेळी तौफिक तांबोली, शेरअली शेख, आबीद दुलेखान यांच्यासह सामाजिक व आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. फातिमा शेख यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले असून त्यांच्या विचारांना आरोग्यसेवेतून पुढे नेण्याचा हा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. सूत्रसंचालन आबीद खान यांनी केले, तर आभार तौफिक तांबोली यांनी मानले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# यशासाठी हार्ड वर्कपेक्षा स्मार्ट वर्क महत्त्वाचे- भागवत

## बाबूजी आव्हाड महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**पाथर्डी । नितीन गटाणी**

एमपीएससी व यूपीएससी परीक्षेत यश मिळवण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी माध्यम असा फरक नसून, स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर हार्ड वर्कपेक्षाही पूर्ण क्षमतेने स्मार्ट वर्क केले पाहिजे. कोणत्याही अडचणीचे भांडवल न करता प्रामाणिकपणे या परीक्षांना सामोरे गेल्यास ग्रामीण विद्यार्थीही कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतात, असे प्रतिपादन तेलंगणा राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक महेश भागवत यांनी केले. येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष अभय आव्हाड होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बबन चौरे व विवेकानंद विद्या मंदिरचे मुख्याध्यापक शरद मेढे उपस्थित होते. महेश भागवत म्हणाले, या वर्षीपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेचा अभ्यासक्रम बदलला असून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर तो वर्णनात्मक करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही परीक्षांचा एकाच वेळी अभ्यास करणे शक्य होणार आहे. मोबाईल व इंटरनेटमुळे विद्यार्थ्यांमध्ये लिखाणाचे कौशल्य कमी झाले आहे. जोपर्यंत शिक्षणाचा पाया भक्कम होत नाही, तोपर्यंत यश मिळणे दुरापास्त आहे.

राज्य सरकारच्या धोरणानुसार नववीपर्यंत विद्यार्थ्यांना सरसकट पास करण्याचे दुष्परिणाम खूप झाले आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमी उच्च ध्येय ठेवणे आवश्यक आहे. पदवीच्या प्रथम वर्षापासूनच यूपीएससी परीक्षांची तयारी सुरू केल्यास अपेक्षित ध्येय लवकर गाठता येते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना 'परीक्षार्थी' होणे अत्यंत महत्त्वाचे असून, तीन तासांच्या वेळेत सोडविलेला पेपर तपासणाऱ्या व्यक्तीच्या नजरेत भरायला हवा. यासाठी हार्ड वर्कपेक्षाही स्मार्ट वर्क करणे आवश्यक आहे. आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर कोणीतरी आयडॉल समोर ठेवायला हवा. पाथर्डी तालुक्यातून यूपीएससीचा टक्का वाढत आहे, ही भूषणावह बाब आहे. कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे हे सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी ठरवणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा ही वेळखाऊ प्रक्रिया असून त्यासाठी संयम महत्त्वाचा आहे. प्रयत्नात सातत्य, सकारात्मक दृष्टिकोन, कठोर मेहनत व दुर्दम्य इच्छाशक्ती असल्यास कोणत्याही परीक्षेत प्रावीण्य मिळविता येते. सध्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी प्रचंड स्पर्धा आहे. प्रत्येकासाठी वेळ मौल्यवान असून या क्षेत्रात करिअर करायचे असल्यास दिवस-रात्र एक करून अभ्यास करा, यश निश्चित मिळेल, असेही भागवत यांनी सांगितले. बाबूजी आव्हाड महाविद्यालयाने क्रीडा, स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक व सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांनी केले, तर आभार प्रा. दत्तप्रसाद पालवे यांनी मानले.

# ग्रामीण भागातून वैद्यकीय शिखराकडे झेप

## डॉ. रोहन काकडे ऑर्थोपेडिक्स तज्ज्ञ

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गदेवाडी या ग्रामीण भागातून वैद्यकीय शिक्षणाच्या सर्वोच्च टप्प्यापर्यंत मजल मारणाऱ्या डॉ. रोहन उद्धव काकडे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एम.एस. (ऑर्थोपेडिक्स) ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरित्या प्राप्त करून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. सामान्य कुटुंब, ग्रामीण पार्श्वभूमी आणि मर्यादित साधनसामग्री असूनही कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास व प्रबळ जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले. यापूर्वी त्यांनी बी.जे. मेडिकल कॉलेज येथून एम.बी.बी.एस. पदवी पूर्ण केली होती. एम.एस. ऑर्थोपेडिक्ससारखा अत्यंत कठीण व स्पर्धात्मक अभ्यासक्रम पूर्ण करताना त्यांनी अनेक मानसिक ताण, झोप न झालेल्या रात्री आणि कठोर शिस्तीचा सामना केला. या यशामागे गुरुजनांचे मार्गदर्शन, आईच्या प्रार्थना,



वडिलांचा अढळ विश्वास, भावाचे सततचे प्रोत्साहन आणि मित्र-मैत्रिणींची साथ हे महत्त्वाचे आधार ठरले. ''अपयशाच्या भीतीपेक्षा यशाची ओढ मोठी होती,'' असे त्यांच्या जवळच्या व्यक्ती सांगतात. आज डॉ. रोहन काकडे यांचे यश केवळ वैयक्तिक नसून ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वैद्यकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी महायुती सज्ज

**नेवासा । विजय खंडागळे**

नुकत्याच महापालिकेच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात प्रथमच एकट्या भाजपाने निम्म्याहून अधिक जागा जिंकत 'मोठा भाऊ' सिद्ध केला. आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची या विजयी जल्लोषात चर्चा लगबग सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुसऱ्या टप्प्यात जरी अहिल्यानगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होण्याअगोदरच, आत्तापासूनच भाजपा-शिवसेना मित्रपक्षात (महायुतीत) निवडणुकीसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

नेवासा तालुक्यामध्ये महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे, माजी मंत्री शंकरराव गडाख व उपमुख्यमंत्री राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या नेतृत्वाखाली या निवडणुका होणार असून, याबाबत महायुतीचे आमदार लंघे यांच्यासोबत काही कार्यकर्ते संपर्क साधून भावी सदस्य होण्यासाठी माहिती घेत असल्याची चर्चा तालुक्यात रंगत आहे. यामध्ये भाजपा, शिवसेना (शिंदे गट), क्रांतिकारी शेतकरी पक्ष (माजी मंत्री शंकरराव गडाख गट), शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), आम आदमी पार्टी आणि शेतकरी पक्ष यांच्यात लढत होण्याची शक्यता आहे. आमदार लंघे हे वेगवेगळ्या कार्यक्रमात गेल्यानंतर कार्यकर्त्यांबरोबर संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा करत असल्याचेही बोलले जात आहे. राज्यात भाजपाच्या पारड्यात १४२५ जागा पडल्याने जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुकीसाठी महायुती कार्यकर्ते पक्षबांधणीसाठी जोरदार शक्ती पणाला लावण्याच्या तयारीला लागले आहेत. ग्रामीण भागात महायुती पक्षाचे चिन्ह घराघरात पोहोचल्याने भाजपा-महायुतीविषयी जनता गांभीर्याने विचार करत असल्याचे चित्र आहे. नेवासा तालुक्यात माजी मंत्री व क्रांतिकारी शेतकरी पक्षाचे सर्वेसर्वा शंकरराव गडाख यांचे मोठे वर्चस्व असल्याने तेही जोरदार टक्कर देण्यासाठी सज्ज झाले आहेत. तर आ. लंघे हे आतापासूनच महायुतीचे विजयी उमेदवार ठरवण्यासाठी उमेदवारांची योग्य चाचपणी करण्याच्या हालचाली तालुक्यात सुरू केल्याचे दिसून येते. दरम्यान, खासदार शरद पवार गट व उपमुख्यमंत्री अजित पवार गटातील कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे निवडणुका लढाव्या का, याबाबत चर्चा होत असताना वरिष्ठांच्या निर्णयानुसार लढतीची अंतिम दिशा ठरणार हेही तितकेच खरे आहे. सर्वच पक्षांनी लढतीसाठी व्यूहरचना आखण्यास सुरुवात केली असून मतांचे विभाजन होऊ नये म्हणून राजकीय आखाडे बांधताना समीकरणे जुळवली जात आहेत. कोण कोणती राजनीती ठरवतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# श्रद्धेला कृतीची जोड; स्वयंस्फूर्तीने श्रमदानातून स्वच्छता

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव येथे मकर संक्रांत आणि षट्तिला एकादशी हा केवळ धार्मिक विधींचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला. या पवित्र दिवशी मंदिरात दर्शनासाठी जाताना अनेकजण हात जोडतात, नवस बोलतात आणि पुढे निघून जातात. मात्र याच दिवशी मंदिर व ग्रामपंचायत परिसरात काही जागरूक ग्रामस्थांनी कोणताही गाजावाजा न करता स्वयंस्फूर्तीने स्वच्छतेचे श्रमदान करून भक्तीचा खरा अर्थ समाजासमोर ठेवला. हे श्रमदान केवळ कचरा उचलण्यापुरते मर्यादित नव्हते, तर धार्मिकतेला सामाजिक जबाबदारीची जोड देणारे ठोस पाऊल होते.



देवाच्या चरणी नतमस्तक होण्याआधी आणि नंतर आपण ज्या परिसरात वावरतो तो स्वच्छ ठेवणे हेदेखील भक्तीच आहे, हे या कृतीतून अधोरेखित झाले. श्रमातून मिळणारे समाधान हे केवळ मूर्तीच्या दर्शनाइतकेच नव्हे, तर अंतःकरण जागे करणारे ठरले. षट्तिला एकादशीच्या निमित्ताने तीळदान, उपवास आणि जपाला महत्त्व दिले जाते. मात्र आजच्या काळात सेवाभावाचा 'एक तीळ' समाजासाठी अर्पण करणे अधिक गरजेचे आहे. स्वच्छ मंदिर, स्वच्छ गाव आणि स्वच्छ सार्वजनिक परिसर हेच खऱ्या श्रद्धेचे प्रतीक ठरू शकतात.

आज प्रश्न असा आहे की देव आपण मंदिरात शोधतो, की आपल्या कृतीत? फक्त आरत्या आणि घंटानादाने भक्ती पूर्ण होते का, की समाजासाठी हातभार लावल्यावरच ती अर्थपूर्ण ठरते? स्वच्छ परिसरातच प्रसन्न मन निर्माण होते आणि प्रसन्न मनातच ईश्वराचा खरा वास असतो, हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे. म्हणूनच प्रत्येक भाविकाने दर्शनापुरते न थांबता सार्वजनिक स्वच्छता, सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी स्वीकारावी. भक्ती आणि सेवा यांची सांगड घातली, तरच सणांना व परंपरांना खरा सामाजिक अर्थ प्राप्त होईल आणि तोच या मकर संक्रांतीचा खरा संदेश आहे.

## वाळू तस्करांना लगाम!

# संगमनेर महसूलची धडक कारवाई



**संगमनेर । रयत समाचार**

अवैध वाळू उपशावर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवण्यासाठी संगमनेर महसूल प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. तहसीलदार धीरज मांजरे यांच्या नेतृत्वाखाली नदीपात्राकडे जाणारे प्रमुख रस्ते थेट खोदून (चर मारून) बंद करण्यात आले आहेत.

या अभिनव आणि प्रभावी उपाययोजनेमुळे वाळू तस्करांचे मार्गच बंद झाले असून, अवैध वाहतुकीला मोठा आळा बसणार आहे. प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे नदीपात्रांचे संरक्षण, पर्यावरण संतुलन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन साध्य होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

महसूल प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला असून, अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनीही अशा बेकायदेशीर प्रकारांची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# आशिष गायकवाड यांची वित्त व लेखा अधिकारीपदी निवड; ग्रामस्थांकडून सत्कार

**नगर तालुका । रयत समाचार**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा स्पर्धा परीक्षेत पिंपळगाव माळवी येथील आशिष सुनील गायकवाड यांची वित्त व लेखा अधिकारीपदी निवड झाली.

त्यानिमित्त श्री संत सावता माळी पतसंस्था, ग्रामस्थ आणि समृद्धी ट्रेकिंग ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांचा सत्कार समारंभ रविवार, ता. १८ रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच दत्तात्रय भोंदे होते. यावेळी संत सावता माळी पतसंस्थेचे संस्थापक प्रा. देवराम शिंदे, प्राचार्य विजय गायकवाड, ऑनररी कॅप्टन हरीराम शिंदे, शैलेंद्र काळे, संतोष कुमटकर, एकनाथ व्यवहारे, मनीषा जांभळे, कांचन गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ, भजनी मंडळ व समृद्धी ट्रेकिंग ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. प्रा. देवराम शिंदे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आणि क्षमता असते.

**माझ्या यशामागे आई-वडील, गुरुजन आणि ग्रामस्थांचे आशीर्वाद आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवले तर स्पर्धा परीक्षेत नक्की यश मिळते. हे यश फक्त माझे नाही, तर संपूर्ण गावाचे आहे.**

-आशिष गायकवाड,

फक्त योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची गरज असते. आशिष गायकवाड यांनी खडतर परिश्रम करून राज्यसेवा परीक्षेत यश मिळवले आहे, याचा संपूर्ण गावाला सार्थ अभिमान आहे. पतसंस्थेने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका सुरू केली असून या भागातील तरुणांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यास मदत होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष बनकर यांनी केले, तर आभार रोहिदास पुंड यांनी मानले. हा कार्यक्रम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून स्थानिक पातळीवर शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीला चालना देणारा ठरला आहे.

# भारत सातपुते यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त रामराव ढोक यांचे हरीकीर्तन

**पाथर्डी । रयत समाचार**



पाथर्डी तालुक्यातील साकेगावचे भूमिपुत्र व यशस्वी उद्योजक भारत काशीनाथ सातपुते यांचा ६१ वा अभिष्टचिंतन सोहळा सोमवार, ता. १९ जानेवारी २०२६ रोजी साकेगाव येथील रेणुकामाता मंदिराच्या आवारात आयोजित करण्यात आला आहे. या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी नागपूर येथील प्रसिद्ध कीर्तनकार हभप रामराव महाराज ढोक हे उपस्थित राहणार असून त्यांचे संकीर्तन यानिमित्त होणार आहे. या सोहळ्यानिमित्त सकाळी वैदिक मंत्रोच्चारात पूजन, यज्ञिक होम-हवन, चारधाम यात्रापूर्ती व ग्रंथपूजन होणार असून दुपारी रेणुकामाता मंदिर भक्तनिवासाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. सायंकाळी गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व अभिष्टचिंतन सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमास हभप मुकुंदराव जाटदेवळेकर व हभप आदिनाथ महाराज शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमासाठी आमदार मोनिका राजळे, भोसरीचे माजी आमदार विलासराव लांडे पाटील, अहिल्यानगर मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील, तेलंगणा येथील अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत, चंद्रकांत रासकर, संजय वाबळे, राहुल राजळे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, किशोर ढोकले, संदीप बेलसरे, संजीव शिंदे, प्रकाश पाटील, सरपंच सौ. अलका सातपुते, शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन सोनेगाव ग्रामस्थ, नाना-नाणी पार्क मित्रमंडळ, इंद्रायनानगर (पुणे) व समर्थ कॉलनी मित्रमंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. सर्व भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# शिवजन्मोत्सव समिती अध्यक्षपदी मिरा खेंडके यांची निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा शहराचे ग्रामदैवत संत शेख महंमद महाराज यांच्या मंदिरामध्ये आगामी शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित बैठकीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी मीरा खेंडके यांची तसेच उपाध्यक्षपदी चेतना मांगडे, सचिवपदी सुनील ढवळे, खजिनदारपदी बालू मखरे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष मीरा खेंडके व पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक श्रीकृष्ण धुमाळ, सोनू कोथिंबीरे, अनिल औटी यांचा सन्मान सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे मावळते अध्यक्ष बालू मखरे यांनी केला. बैठकीचे प्रास्ताविक अरविंद कापसे यांनी केले, तर आभार बालू मखरे यांनी मानले.

यावेळी माजी नगरसेवक सतीश मखरे, नितीन सोनवणे, आप्पासाहेब सोनवणे, रमण सोनवणे, अर्जुन सोनवणे, राजाभाऊ जगताप, शिवाजी शेळके यांच्यासह सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे सदस्य अरविंद कापसे, राजेंद्र राऊत, नाना शिंदे, दीपक मखरे, आजीज शेख, गणेश पारे, दिलीप लबडे, इंजि. शाम जरे आदी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक करताना अरविंद कापसे यांनी सांगितले की, आगामी शिवजयंती उत्सव सालाबादप्रमाणे भव्यदिव्य होणार आहे.

शिवप्रतिमा पूजन व पालखी मिरवणूक, मॅरेथॉन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, छत्रपती बाईक रॅली, ढोलपथक, लेझीम पथक, झांज पथक, शिवकालीन शस्त्रविद्या, कराटे प्रात्यक्षिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच महात्मा फुले सर्कल येथे दीपोत्सव अशी कार्यक्रमाची रूपरेषा असणार आहे. या कार्यक्रमास तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्व आजी-माजी नगरसेवक, सर्व सरपंच, उपसरपंच, चेअरमन आणि तमाम शिवप्रेमी उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी मीरा खेंडके यांची तसेच उपाध्यक्षपदी चेतना मांगडे, सचिवपदी सुनील ढवळे, खजिनदारपदी बालू मखरे यांची निवड झाल्याबद्दल सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह सर्व स्तरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रज्ञाशोध परीक्षेत गंगामाई पब्लिक स्कूलचे घवघवीत यश




**शेवगाव । लक्ष्मण मडके**

घोटण येथील गंगामाई पब्लिक स्कूलने शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत एन.बी. प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेच्या इयत्ता चौथीतील चार विद्यार्थ्यांनी या स्पर्धात्मक परीक्षेत चमकदार कामगिरी करत शाळेच्या नावात भर घातली आहे. या परीक्षेत स्वरा सुधीर पवार व वेदिका प्रकाश कातकडे यांनी तालुक्यात ८ वा क्रमांक मिळवत विशेष यश संपादन केले. याशिवाय ऋतुजा संदीप मडके हिने तालुक्यात १३ वा क्रमांक, तर अथर्व गणेश म्हस्के याने २६ वा क्रमांक पटकावत गुणवत्तेची छाप उमटवली आहे. लहान वयातच स्पर्धा परीक्षांची तयारी, अभ्यासातील सातत्य, शिस्तबद्ध अभ्यासक्रम आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे बोलले जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, तार्किक विचारशक्ती विकसित करणे व स्पर्धात्मक वृत्ती रुजवणे या उद्देशाने गंगामाई पब्लिक स्कूलकडून सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून हे यश पाहिले जात आहे. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक व प्राचार्य हरीश टाकळकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी बालवयातच मिळवलेले हे यश पुढील शैक्षणिक प्रवासासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत घेत मोठे यश संपादन करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. गंगामाई पब्लिक स्कूलचे विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रासोबतच विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्येही आपली गुणवत्ता सिद्ध करत असून हे यश शाळेच्या उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीचे द्योतक असल्याचे मत पालकवर्गातून व्यक्त होत आहे.

# उखलगाव शाळेची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची विश्वासार्ह वाटचाल

## महिला पालकांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उखलगाव येथे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, संस्कारक्षम व सर्वांगीण विकास घडवणारे शिक्षण दिले जात आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध वातावरण, उपक्रमशील अध्यापन आणि पालकांचा सक्रिय सहभाग यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती सातत्याने होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. येथील शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसून समज, आत्मविश्वास, संवादकौशल्य, शिस्त व संस्कार यांवर विशेष भर दिला जातो. विविध शैक्षणिक उपक्रम, स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व पालकांसोबतचे संवाद यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. शिक्षकांकडून प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जात असल्याने मुले आत्मविश्वासाने पुढे जात आहेत. आपुलकीचे वातावरण, शिक्षकांची तळमळ व शाळेतील सकारात्मक संस्कृतीमुळे पालकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा आज मुलांचे भविष्य घडवणारे सशक्त केंद्र म्हणून ओळख निर्माण करत आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उखलगाव येथे महिला पालक व महिला भगिनींसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. नेहा गोपाळे (एम.डी. आयुर्वेद) यांनी स्त्रियांच्या आरोग्यावर मार्गदर्शन करत उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमात संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा, पास द बॉल अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. महिला पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत मनमुराद आनंद लुटला. कार्यक्रमामुळे महिलांमध्ये एकोप्याची भावना व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन कोहकडे-पवार, अंगणवाडी सेविका लता ढवळे, सोनाली वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिवटे, पवार, दरेकर, राहुल वाळके यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक पवार यांनी उपस्थित सर्व महिला पालकांचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानले. हा उपक्रम शाळा-पालक समन्वय अधिक दृढ करणारा, महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करणारा व आनंददायी ठरला.



# समर्थ स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तासगाव (जि. सांगली) येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत ता. १७ ते १९ जानेवारी रोजी आयोजित शालेय राज्यस्तरीय थाय बॉक्सिंग स्पर्धेत समर्थ स्पोर्ट्स अकॅडमी, अहिल्यानगर (वाळकी) येथील सुभूती भालसिंग व आरोही काळघुगे या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवून घवघवीत यश संपादन केले.

या यशामुळे त्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडू गेल्या चार वर्षांपासून समर्थ स्पोर्ट्स अकॅडमी, वाळकी येथे प्रशिक्षण घेत असून त्यांना क्रीडा प्रशिक्षक गौरव घोडके यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या क्रीडाक्षेत्रातील यशाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी यश मिळविल्याचे सांगत त्यांनी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# जर्मनीतून थेट सेवेसाठी तज्ज्ञ डॉक्टर शेवगावात

## नित्यसेवा हॉस्पिटलमध्ये मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आंतरराष्ट्रीय मैत्रीचे जिवंत उदाहरण ठरणारे आणि गरजू रुग्णांसाठी आशेचा किरण ठरणारे मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील नित्यसेवा हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आले आहे. इंडो-जर्मन फ्रेंडशिप उपक्रमांतर्गत जर्मनीतील तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत हे शिबिर १९ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. या शिबिराची औपचारिक सुरुवात १९ जानेवारीपासून होणार असून २१ जानेवारी रोजी शिबिराचे उद्घाटन करण्यात येणार आहे. जर्मनीतील सामाजिक कार्यकर्त्या व वैद्यकीय सेवेसाठी प्रसिद्ध असलेल्या डॉ. पेत्रा कार्कवील या संपूर्ण मोहिमेचे नेतृत्व करत आहेत. या आंतरराष्ट्रीय शिबिरामध्ये जर्मनीतील तज्ज्ञ डॉक्टरांसह भारतातील नामांकित प्लास्टिक सर्जन सहभागी होणार आहेत. यामध्ये इंदोर येथील डॉ. प्रकाश छजलानी, डॉ. अमन, हैदराबाद येथील डॉ. सूर्याकुमारी तसेच लोणी येथील डॉ. अमोल हे अनुभवी डॉक्टर रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा देणार आहेत.



या शिबिरात विशेषतः बालरुग्ण, जळालेले व भाजलेले रुग्ण, दुभंगलेले ओठ (क्लेफ्ट लिप), त्वचेवरील ट्यूमर तसेच नाक व चेहऱ्यावरील बाह्य विकृती यावर तज्ज्ञांमार्फत प्लास्टिक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. अनेक रुग्णांसाठी हे शिबिर नव्या आयुष्याची सुरुवात ठरणार आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी शिबिराच्या कालावधीत १८ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे, हे या शिबिराचे विशेष आकर्षण ठरत आहे. चेहऱ्यावर किंवा शरीरावर कोणतेही जन्मजात अथवा अपघातजन्य व्यंग असलेल्या गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिबिर संयोजक फादर प्रकाश राऊत तसेच नित्यसेवा हॉस्पिटलचे डॉक्टर्स, सिस्टर्स व आरोग्य सेविकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी इच्छुकांनी तात्काळ नित्यसेवा हॉस्पिटल, शेवगाव येथे संपर्क साधावा, असेही कळवण्यात आले आहे.

# स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी- डोंगरे

## राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त स्वच्छता अभियान

**नगर तालुका । रयत समाचार**

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय तसेच संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता समिती, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने साकूर (ता. संगमनेर) येथील श्री बिरोबा देवस्थान मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व 'मेरा युवा भारत' यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या राष्ट्रीय युवा सप्ताहानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तसेच संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता समितीचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या पुढाकाराने हे अभियान राबविण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक, युवक व नागरिकांनी सहभाग नोंदवून मंदिर परिसर स्वच्छ केला. या स्वच्छता अभियानात मंदिर परिसरातील कचरा संकलन, परिसर स्वच्छता तसेच प्लास्टिक व टाकाऊ वस्तू हटविण्याचे काम करण्यात आले. 'स्वच्छ भारत' या राष्ट्रीय अभियानाचा संदेश देत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. स्वच्छ व पवित्र परिसर राखण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.



याप्रसंगी बोलताना पै. नाना डोंगरे म्हणाले की, सार्वजनिक स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. युवक व नागरिकांनी पुढाकार घेतल्यास स्वच्छतेची व्यापक चळवळ उभी राहू शकते आणि त्यातूनच स्वच्छ भारताचे स्वप्न साकार होईल. स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता ती दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, निरोगी आरोग्यासाठी स्वच्छतेची नितांत गरज आहे. परिसर स्वच्छ असल्यास साथीचे आजार पसरण्याचा धोका कमी होतो आणि नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहते. स्वच्छ व सुंदर भारत घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपले योगदान देणे अत्यावश्यक आहे. या अभियानात सुभाष जाधव, सुनील जाधव, साहेबराव बोडखे, श्री नवनाथ युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे, सुखदेव जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते, युवक व ग्रामस्थ सहभागी झाले होते. सर्वांनी श्रमदान करत स्वच्छतेचा संदेश दिला. या उपक्रमासाठी 'मेरा युवा भारत'चे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे तसेच रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अहमदनगर महाविद्यालयात 'नेक्सजेन २०२६'चे आयोजन




**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालयाच्या बीबीए विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने 'नेक्सजेन २०२६' या भव्य प्रदर्शनाचे आयोजन बुधवार, ता. २१ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत करण्यात आले आहे.

हे प्रदर्शन अहमदनगर महाविद्यालयाच्या प्लेग्राउंडवर होणार असून खरेदी-विक्रीसह मनोरंजनाचा अनोखा अनुभव नगरकरांना मिळणार आहे. 'मजा, मस्ती, खाना और गाना' या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनात ५० हून अधिक स्टॉल्स असणार आहेत. यामध्ये कपडे, मोबाईल अ‍ॅक्सेसरीज, ज्वेलरी, विविध शैक्षणिक संस्थांचे स्टॉल्स, ऑटोमोबाईल्स तसेच विविध प्रकारचे फूड स्टॉल्स यांचा समावेश आहे. त्यामुळे सर्व वयोगटातील नागरिकांसाठी हे प्रदर्शन आकर्षण ठरणार आहे. या उपक्रमाचे मुख्य प्रायोजक भन्साळी टीव्हीएस असून हे टायटल स्पॉन्सर आहेत. तसेच हे को-स्पॉन्सर आहेत. बीबीए विभागप्रमुख डॉ. तुषिता अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापकवर्ग विद्यार्थ्यांना या उपक्रमासाठी मार्गदर्शन करत आहेत. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे सायंकाळी चार वाजल्यानंतर होणारा लाईव्ह म्युझिक कॉन्सर्ट, ज्यामुळे तरुणाईसह संगीतप्रेमींना खास आनंद घेता येणार आहे. सर्व नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट देऊन खरेदीसह मनोरंजनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन बीबीए विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.